**आरबीआय / २०११-१२/२०**
**डीएनबीएस(पीडी)सीसी.क्र. २२६/ ०३.०२.००१ / २०११-१२** **जुलै १, २०११**

अध्यक्ष/सीईओ सर्व अबँकीय वित्तीय कंपन्या व संकीर्ण अबँकीय कंपन्या सोडून (अवशिष्ट अबँकीय कंपन्या व संकीर्ण अबँकीय कंपन्या सोडून)

महोदय,

**जून ३०, २०११ पर्यंत सुधारित अधिसूचना - " अबँकीय वित्तीय कंपन्या ऑडिटर अहवाल (रिझर्व बँक) निदेश, २००८"**

आपणस माहितच आहे की, ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी रिझर्व बँक परिपत्रके/अधिसूचना देत असते. अधिसूचना क्र. डीएनबीएस.२०१/डीजी(व्हीएल) २००८ दि. सप्टेंबर १८, २००८ मधील सूचना, जून ३०, २०११ पर्यंत अद्यावत करुन खाली देण्यात आल्या आहेत. ही अद्यावत अधिसूचना आरबीआयच्या (http://www.rbi.org.in) ह्या वेबसाईटवरही टाकण्यात आली आहे.

आपली
(उमा सुब्रह्मण्यम)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

**भारतीय रिझर्व बँक**
**अबँकीय पर्यवेक्षण विभाग**
**केंद्रीय कार्यालय**
**केंद्र - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर कफ परेड**
**कुलाबा - मुंबई ४००००५**

**अधिसूचना क्र. डीएनबीएस.२०१/डीजी (व्हीएल)-२००८ दि. सप्टेंबर १८, २००८**

सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक वाटल्याने आणि एनबीएफसींच्या लेखापुस्तकांचे योग्य मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने, भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ (१९३४ चा अधिनियम २) च्या कलम ४५ एमएच्या उपकलम (१ए) ने दिलेल्या अधिकारांचा आणि ह्याबाबत दिल्या गेलेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन आणि अबँकीय वित्तीय कंपन्या ऑडिटर - अहवाल (रिझर्व बँक) निदेश १९९८ रद्द करुन, भारतीय रिझर्व बँक, (ह्यापुढे जिला "ही बँक" म्हणण्यात आले आहे) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनीच्या प्रत्येक ऑडिटरला पुढील प्रमाणे विहित केलेले निदेश देत आहे.

**१. <u>ह्या निदेशांचे लघु शीर्षक, लागु होणे व सुरुवात.</u>**

१) ह्या निदेशांना " अबँकीय वित्तीय कंपन्या ऑडिटर-अहवाल (रिझर्व बँक) निदेश, २००८" असे संबोधिले जाईल.
२) हे निदेश, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४(१९३४ चा २) च्या कलम ४५ आय (एफ) मध्ये व्याख्या केलेल्या अबँकीय वित्तीय कंपनीच्या (जिला ह्यापुढे अबँकीय वित्तीय कंपनी संबोधिले आले आहे) प्रत्येक ऑडिटरला लागु होतील.
३) हे निदेश ताबाडतोब जारी केले जातील.

**२. <u>ऑडिटरांनी संचालक मंडळाला अतिरिक्त अहवाल देणे.</u>**

कंपनीज अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम २२७ खाली, एखाद्या अबँकीय वित्तीय कंपनीच्या लेखांवर तयार केलेला व कोणत्याही दिवशी संपणाऱ्या किंवा हे निदेशा सुरु झाल्यानंतरच्या आर्थिक वर्षासाठी तपासलेल्या अहवाला व्यतिरिक्त, ऑडिटर, खालील परिच्छेद ३ व ४ मध्ये विहित केलेल्या बाबींवरील अतिरिक्त अहवाल त्या कंपनीच्या संचालक मंडळाला सादर करील.

**३. <u>ऑडिटरांच्या अहवालात समाविष्ट करावयाच्या बाबी</u>**

एखाद्या अबँकीय वित्तीय कंपनीच्या लेखांवरील ऑडिटरने सादर केलेल्या अहवालात पुढील बाबींवरील विवरणपत्राचा समावेश केला जावा.

**अ. <u>अबँकीय वित्तीय कंपनीच्या बाबतीत</u>**

१) ती कंपनी अबँकीय वित्तीय कंपनीचा व्यवसाय करत आहे काय व तिने ह्या बँकेकडून पंजीकरण प्रमाणपत्र (सीओआर) मिळविले आहे काय,

२) जर ह्या कंपनीने ह्या बँकेकडून पंजीकरण प्रमाणपत्र (सीओआर) मिळविले आहे आणि ती कंपनी, लागु असलेल्या वर्षाच्या मार्च ३१ रोजी असलेल्या ॲसेट/उत्पन्नाच्या साचानुसार असे सीओआर धारण करणे सुरु ठेवण्यास पात्र आहे काय?

**टीपा:** ह्याबाबत ठेवी स्वीकारणाऱ्या एनबीएफसींनी अबँकीय वित्तीय (ठेवी स्वीकारणाऱ्या किंवा धारण करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या परिच्छेद १५च्या आणि ठेवी न स्वीकारणाऱ्या एनबीएफसींसाठी, अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणाऱ्या किंवा धारण न करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या परिच्छेद १५ चा संदर्भ घ्यावा.

३) ह्या बँकेने, कंपनी परिपत्रक क्र. डीएनबीएस.पीडी.सीसी.क्र.८५/०३.२.०८९/२००६-०७ दि.डिसेंबर ६,२००६ मध्ये, ॲसेट फायनान्स कंपनी (एएफसी) म्हणून एनबीएफसीचे वर्गीकरण करण्यासाठी ठरविलेल्या निकषांवर आधारित, लागु असलेल्या वित्तीय वर्षात तिने केलेल्या व्यवसायाच्या संदर्भात, त्या वित्तीय अबँकीय कंपनीचे वर्गीकरण, अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८ मध्ये व्याख्या केल्यानुसार एक एएफसी म्हणून योग्यपणे केले गेले आहे काय.

**ब. सार्वजनिक ठेवी स्वीकारणाऱ्या धारण करणाऱ्या अबँकीय वित्तीय कंपनीच्या बाबतीत**

वरील (अ) मध्ये निर्देशित केलेल्या बार्बी व्यतिरिक्त, ऑडिटर पुढील बाबी समाविष्ट असलेले विवरणपत्र सादर करील.

१) त्या कंपनीने स्वीकारलेल्या सार्वजनिक ठेवी व खाली दिल्यानुसार असलेली कर्जे (बॉरोइंग्ज्)
अ) अप्रतिभूतित अपरिवर्तनीय डिबेंचर्स/बाँड्स देऊन जनतेकडून मिळविलेली
ब) तिच्या शेअर होल्डर्सकडून मिळविलेली (ती पब्लिक लिमिटेड कंपनी नसल्यास) आणि
अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८ मधील "सार्वजनिक ठेवी"च्या व्याख्येमधून वगळण्यात न आलेली

अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश १९९८ च्या तरतुदीनुसार त्या कंपनीला परवानगी असलेल्या मर्यादांच्या आत असलेली.

२) त्या कंपनीने धारण केलेल्या सार्वजनिक ठेवी, अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८ च्या तरतुदींखाली परवानगी असलेल्या अशा ठेवींच्या आकारमानापेक्षा जास्त असल्यास त्या, ह्या निदेशांमध्ये दिलेल्या रीतींनुसार नियमित करण्यात आल्या आहेत काय.

३) कॅपिटल टु रिस्क ॲसेट रेशो (सीआरएआर) १५ % पेक्षा कमी असलेली ॲसेट फायनान्स कंपनी किंवा अबँकीय वित्तीय कंपनी सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८ च्या अनुक्रमे परिच्छेद २(१) आयए, ४ आणि ७ मध्ये व्याख्या केलेली गुंतवणुक कंपनी किंवा कर्ज कंपनी, एखाद्या मंजुरीप्राप्त क्रेडिट रेटिंग एजन्सीकडील किमान गुंतवणुक दर्जा क्रेडिट शिवाय "सार्वजनिक ठेवी" स्वीकारत आहे काय.

४) वरील खंड (४) मध्ये संदर्भित एनबीएफसींच्या बाबतीत, अबँकीय वित्तीय कंपन्या ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८ मध्ये दिलेल्या क्रेडिट रेटिंग एजन्सींपैकी एखाद्या एजन्सीने दिलेले क्रेडिट रेटिंग, प्रत्येक स्थिर ठेव योजनेसाठी जारी करण्यात आले आहे काय आणि वर्षभरातील कोणत्याही वेळी, आउटस्टँडिंग असलेल्या ठेवींची एकूण रक्कम, त्या क्रेडिट रेटिंग एजन्सीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक आहे काय.

५) रु २५ लाखांपेक्षा अधिक परंतु रु २०० लाखांपेक्षा कमी नक्त निजनिधी असलेल्या एनबीएफसींच्या बाबतीत, अशा कंपन्यांची धारण केलेल्या सार्वजनिक ठेवींची रक्कम, अधिसूचना क्र. डीएनबीएस.१९९/सीजीएम(पीके) -२००८ दि.जून १७, २००८ मध्ये, अशा ठेवींबाबत परवानगी दिलेल्या आकारमानापेक्षा जास्त आहे काय, आणि अशा कंपनीने ह्या

अधिसूचनेच्या तारखेस ठेवींचा स्तर गोठविला आहे काय किंवा तिचा ठेवींचा स्तर, ह्या अधिसूचनेच्या अटींनुसार सुधारित मर्यादास्तरापर्यंत आणला आहे काय.
६) मुद्दल आणि/किंवा व्याज देय झाल्यानंतर त्या कंपनीने, तिच्या ठेवीदारांना व्याज आणि/किंवा मुद्दल देण्यात कसुरी केली आहे काय.

७) अबँकीय वित्तीय कंपन्या (ठेवी स्वीकारणाऱ्या किंवा धारण करणाऱ्या) प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या अटींनुसार, रिझर्व बँकेने दिलेल्या निदेशांनुसार, त्या कंपनीने, इनकम रेकग्निशन, लेखा मापदंड, ॲसेट वर्गीकरण, वाईट व शंकास्पद कर्जांसाठी तरतुद, आणि कर्ज/गुंतवणुकींबाबतची घनता ह्याबाबतच्या तिला लागु असलेल्या प्रुडेंशियल नॉर्म्सचे पालन केले आहे काय.

८) अबँकीय वित्तीय (ठेवी स्वीकारणाऱ्या किंवा धारण करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या अटींनुसार रिझर्व बँकेकडे सादर केलेल्या अहवालात निर्देशित केलेला कॅपिटल ॲडेक्वसी रेशो बिनचुकपणे काढण्यात आला आहे काय व असा रेशो, त्यामध्ये विहित केलेल्या किमान सीआरएआरचे पालन करणारा आहे काय.

९) आरबीआय वित्तीय (ठेवी स्वीकारणाऱ्या किंवा धारण करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या अटींनुसार रिझर्व बँकेकडे सादर केलेल्या अहवालात निर्देशित केलेला कॅपिटल ॲडेक्वसी रेशो बिनचुकपणे काढण्यात आला आहे काय व असा रेशो, त्यामध्ये विहित केलेल्या किमान सीआरएआरचे पालन करणारा आहे काय.

१०) अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८ च्या एनबीएस १ मध्ये विहित केल्यानुसार, त्या कंपनीने, ठरविलेल्या कालावधीत, ह्या बँकेकडे ठेवीवरील अहवाल सादर केला आहे काय.

११) अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८ च्या एनबीएस १ मध्ये विहित केल्यानुसार, त्या कंपनीने, ठरविलेल्या कालावधीत, ह्या बँकेकडे पुडेंशियल नॉर्म्सवरील सहामाही अहवाल सादर केला आहे.

१२) ठेवी गोळा करण्यासाठी नवीन शाखा उघडण्यासाठी किंवा विद्यमान शाखा/कार्यालये बंद करण्याबाबत किंवा एखादा एजंट नेमण्याबाबत, त्या कंपनीने, अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८ मध्ये दिलेल्या आवश्यकतांची पूर्तता केली आहे काय.

**क. <u>सार्वजनिक ठेवी न स्वीकारणाऱ्या अबँकीय वित्तीय कंपनीच्या बाबतीत</u>**

वरील (अ) मध्ये दिलेल्या बाबी व्यतिरिक्त ऑडिटरने पुढील बाबींवरील विवरणपत्र द्यावेः-

१) संचालक मंडळाने कोणत्याही सार्वजनिक ठेवी न स्वीकारण्याबाबत ठराव पारित केला आहे काय

२) संबंधित काल/वर्षांमध्ये त्या कंपनीने काही सार्वजनिक ठेवी स्वीकारल्या आहेत काय.

३) अबँकीय वित्तीय कंपन्या (ठेवी स्वीकारणाऱ्या किंवा धारण करणाऱ्या) प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या अटींनुसार, रिझर्व बँकेने दिलेल्या निदेशांनुसार, त्या कंपनीने, इनकम रेकग्निशन, लेखा मापदंड, ॲसेट वर्गीकरण, वाईट व शंकास्पद कर्जांसाठी तरतुद, आणि कर्ज/गुंतवणुकींबाबतची घनता ह्याबाबतच्या तिला लागु असलेल्या प्रुडेंशियल नॉर्म्सचे पालन केले आहे काय.

४) अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणाऱ्या किंवा धारण न करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या परिच्छेद २(१)(१९) मध्ये व्याख्या केलेल्या, ठेवी न स्वीकारणाऱ्या, सिस्टमॅटकली इंपॉर्टंट एनबीएफसींच्या बाबतीत, ह्या बँकेकडे फॉर्म एनबीएस- ७ मध्ये सादर केलेल्या रिटर्नमध्ये देण्यात आलेला कॅपिटल ॲडेक्वसी रेशो हा बिनचुक काढण्यात आला आहे काय. आणि असा रेशो ह्या बँकेने विहित केलेल्या किमान सीआरएआरचे पालन करणारा आहे काय, त्या कंपनीने ठरविलेल्या कालावधीमध्ये ह्या बँकेकडे, भांडवली निधी, रिस्क ॲसेट्स/एक्स्पोझर्स आणि रिस्क ॲसेट रेशो (एनबीएस-७) चे वार्षिक विवरणपत्र सादर केले आहे काय.

**ड. <u>काही विशिष्ट अटीवर सीओआर करण्याची आवश्यकता नसलेल्या अबँकीय वित्तीय संस्थेचा व्यवसाय करणाऱ्या कंपनीच्या बाबतीत</u>**

ह्या बँकेकडून असे सीओआर घेण्याची आवश्यकता नसल्याची सूचना मिळाली आहे तेथे वरील (अ)(१) मध्ये दिलेल्या बाबींव्यतिरिक्त, ह्या बँकेने कळविलेल्या अटींचे पालन ती कंपनी करत आहे असे प्रमाणपत्र ऑडिटरने समाविष्ट करावे.

**४. <u>अयोग्य (अनफेवरेबल) व सकारण (क्वालिफाईड) विधानांसाठी द्यावयाची कारणे.</u>**

वरील परिच्छेद ३ मधील कोणत्याही बाबींसंबंधाने, ऑडिटरच्या रिपोर्टमध्ये, अयोग्य किंवा क्वालिफाईड विधाने दिलेली असल्यास, त्या रिपोर्टमध्ये, असेल त्यानुसार तशा अयोग्य किंवा सकारण विधानांसाठी कारणे दिली जावीत. जेथे वरील परिच्छेद ३ मधील बाबींवर तो ऑडिटर कोणतेही मत व्यक्त करु शकत नसल्यास, त्या रिपोर्टमध्ये ही सत्यता व त्याची कारणे दिली जावीत.

**५. <u>ह्या बँकेला अपवाद-रिपोर्ट (एक्सेप्शन) देण्याची ऑडिटरची जबाबदारी</u>**

१) जेथे एखाद्या अबँकीय वित्तीय कंपनीच्या बाबतीत, वरील परिच्छेद ३ मध्ये दिलेल्या कोणत्याही बाबीसंबंधीचे निवेदन/विवरण अयोग्य व सकारण असेल किंवा कंपनीच्या ऑडिटरच्या मतेः

त्या कंपनीने रिझर्व बँक अधिनियम १९३४ (१९३४ चा २) च्या प्रकरण ३ ब च्या किंवा अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश,१९९८ च्या किंवा

अबँकीय वित्तीय (ठेवी स्वीकारणाऱ्या किंवा धारण करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या किंवा

अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणाऱ्या किंवा धारण न करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश २००७ च्या तरतुदींचे पालन केलेले नसेल,

तेथे त्या ऑडिटरचीच ही जबाबदारी असेल की त्याने, अशा अयोग्य किंवा सकारण निवेदनांची/पालन न केल्याची त्या कंपनीबाबतची सविस्तार माहिती, अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश,१९९८ च्या सेकंड शेड्युलनुसार, त्या कंपनीचे पंजीकृत कार्यालय ज्याच्या अधिकार क्षेत्राखाली येते त्या रिझर्व बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाच्या डिपार्टमेंट ऑफ नॉन बँकिंग सुपरव्हिजन विभागाला कळवावी.

२) वरील उपपरिच्छेद (१) खाली त्या ऑडिटरचे कर्तव्य हे केवळ आरबीआय अधिनियम १९३४ व निदेश ह्यांच्या तरतुदीचे उल्लंघन केले जाण्याबाबतच असेल.

**६. <u>रद्द करणे व राखून ठेवणे</u>**

अबँकीय वित्तीय कंपन्या ऑडिटर्स रिपोर्ट (रिझर्व बँक) निदेश, १९९८ हे ह्या निदेशांपुढे रद्द समजले जातील.

असे रद्दीकरण झाले तरीही -

अ) येथे रद्द करण्यात आलेल्या निदेशांखाली करण्यात आलेली, करावयाची/करण्यात येणारी कोणतीही कारवाई त्या निदेशांनी नियंत्रित केली जाणे सुरुच राहील.

ब) ह्या रद्दबातल केलेल्या निदेशांशी संदर्भित ह्या बँकेने दिलेल्या इतर अधिसूचनांचा रद्दीकरणाच्या तारखेनंतर ह्या निदेशांचाच, म्हणजे अबँकीय वित्तीय कंपन्या ऑडिटर्स रिपोर्ट (रझर्व बँक) निदेश, २००८ ह्यांचाच असेल.

Sd/-
(व्ही लीलाधर)
डेप्युटी गव्हर्नर